# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/अल्पसंख्यांक/२०१२/६८९

दिनांक :- १६/३/१२

प्रति,

प्राचार्य,
शासकीय/अनुदानित विना अनुदानित,
पदव्युत्तर पदवी/पदवी/पदविका संस्था,

**विषय :- सॅप अभ्यासक्रम आपल्या संस्थामध्ये चालु करणेबाबत.**

संदर्भ :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- ११/तंशिस/२०१२/८० दिनांक :- ९/३/२०१२.

२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/अल्पसंख्यांक/२०१२/६३१ दि. १३/३/२०१२

३. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे कार्यालयातील दिनांक १७/३/२०१२ रोजीचा दुरध्वनी संदेश.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता सॅप अभ्यासक्रम सुरु करण्यासंदर्भात या कार्यालयामार्फत दिनांक १५/३/२०१२ रोजी बैठक आयोजित केलेली होती. त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये शिकत असलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांचे **Online** अर्ज आपले स्तरावर भरुन घ्यावेत. तसेच अर्ज भरुन घेतांना अर्जासोबत आवश्यक असलेले कागदपत्रे जसे शाळेचा दाखला, राशन कार्ड, उत्पन्नाचा दाखला (रुपये २ लक्ष ५० हजार पेक्षा कमी), उत्पन्नाचे व जातीचे प्रतिज्ञापत्र, व रहीवासी प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे तपासावे. सदर अर्जाची प्रिंट आऊट घेऊन त्यास सदर कागदपत्रे जोडुन पुढील आदेशापर्यंत संस्थेत जतन करुन ठेवावे. तसेच ईतर विद्यार्थ्यांचे अर्ज सुध्दा **Online** भरुन घ्यावेत व अर्जाची प्रिंट आऊट जतन करुन ठेवावी.

तसेच आपणास कळविण्यात येते की, याबाबतची माहीती खालील प्रपत्रात या कार्यालयास सादर करावी.

## प्रपत्र

**संस्थेचे नाव :-**

| **अ.क्र.** | **विद्यार्थ्याचे नाव** | **शिकत असलेला वर्ग** | **अल्पसंख्यांक विद्यार्थ्याची वर्गवारी (जात)** |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

तसेच उपरोक्त कार्यक्रमाचे शुल्क सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांचे नावे डी.डी. काढुन डी.डी. या कार्यालयात जमा करावा.

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** १. प्रक्रियायोजक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

२. रोखपाल, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

506

D:\All Letters Manish.doc

Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional